INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# केंद्रस्तरिय अनुसूचित जाती उप–योजनेचे स्वरुप

**प्रा. डॉ. महेंद्र गजधाने**
के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर.

## प्रस्तावना :



सन 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत 15.64 टक्के (201378372) लोकसंख्या असलेल्या देशातील अनुसूचित जाती व नवबौध्यांच्या आर्थीक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी भारतात 6 व्या पंचवार्षीक योजनेत केंद्रस्तरावर 1979 ला अनुसूचित जाती उप–योजना सुरु करण्यात आली. सदर योजना 'सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालय' यामार्फत राबविली जाते. योजनेसाठी अंदाजपत्रकात अनूसुचित जाती व नवबौध्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद केली जाते. सध्या हि योजना 24 राज्ये व केंद्रशासित प्रदेशात सूरु असून या योजने अंतर्गत देशातील 1208 जातींचा समावेश होतो. सदर योजनेमधील कार्यक्रमांची बहूसंख्य अनुसूचित जाती व नवबौध्द व्यक्तींना माहिती नसल्याने त्याचा लाभ त्यांना घेता येत नाही. म्हणून अश्या कार्यक्रमांची माहीती लोकांपर्यंत पोहचावी यासाठी सदर योजनेचा आढावा शोधनिबंधामध्ये घेण्यात आलेला आहे.

## उदिश्ट :–

1 केंद्रस्तरिय अनुसूचित जाती–उपयोजने मधील कार्यक्रमांचे स्वरुप जाणून घेणे.

## संशोधन पध्दती :–

केंद्रस्तरिय अनुसूचित जाती उप–योजनेचे केले स्वरुप जाणून घेत असताना प्रामुख्याने सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालयाच्या अहवालाचा वापर करण्यात आला. प्राप्त माहीतीच्या विश्लेषणासाठी सरासरी व टक्केवारीचा वापर करण्यात आला.

## केंद्रस्तरिय अनुसूचित जाती उप–योजनेचे स्वरूप :–

### शैक्षणिक सबलीकरण :–

अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या शिक्षण सुधारणेच्या दृष्टीने ही सर्वात व्यापक व महत्वाची केंद्रपुरस्कृत योजना आहे. यात अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर व मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती देणे, बाबु जगजीवनराम छात्रावास योनजेव्दारे मुला–मुलींसाठी वस्तीगृह बांधणे त्यांचा विस्तार करणे व त्यांस आर्थिक सहाय्य देणे, 9 वी ते 12 वी मधील निवडक गुणवंत विद्यार्थ्यांना व्यावसायीक कोर्सेससाठीच्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विशेष कोचींग देणे, उच्चशिक्षणात संशोधनात्मक अभ्यासासाठी (डण्चीपसएचीण्) राजीव गांधी नॅशनल फेलोशिप कार्यक्रमाव्दारे आर्थिक मदत करणे, उच्च दर्जा शिक्षणासाठी (प्जेएप्ड) आर्थिक सहाय्य व शिष्यवृत्ती देणे, परदेशी उच्च शिक्षणासाठी ( विज्ञान, तंत्रज्ञान व अभियांत्रिकी विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेट प्राप्त करणसाठी)

शिष्यवृत्ती देणे, स्पर्धा परिक्षेची मोफत तयारी करवून घेण्याचे प्रशिक्षण व संलग्न सेवा देणारे विद्यापीठ, स्यंयंसेवी संघटना व खाजगी संस्थांना वित्तीय सहाय्य व प्रशिक्षणार्थींना निर्वाह भत्ता देणे, विशेष घटक योजनेचा अनुसूचित जाती व नवबौध्दांना झालेला लाभ व त्यामधील समस्या याबाबतचे मुल्यमापनात्मक संशोधन करणाऱ्या तसेच याबाबत चर्चासत्र, कार्यशाळा व प्रशिक्षण राबविणाऱ्या विद्यापिठ, संशोधन संस्था, सवयंसेवी संघटना याना वित्तीय सहाय्य करणे यासारख्या योजना व कार्यक्रमाचा समावेश शैक्षणिक सबलीकरणात होतो.

## आर्थिक सबलीकरण :–

यात दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जातींच्या कुटूंबांच्या आर्थीक विकासाच्या कुटूंबोन्मुख योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशासाठी त्यांच्या अनुसूचित जाती उपयोजनेसाठी अनुदान देणे, दारिद्ररेषेखालील पात्र अनुसूचित जातींच्या कुटुंबाना कर्जपूरवठा करण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधील राज्य अनुसूचित जाती विकास महामंडळांना अर्थसहाय्य करणे, अनुसूचित जाती विकास महामंडळाच्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील बेरोजगार तरूणांना कौशल्य प्रशिक्षणासाठी अनूदान देणे व स्वयंरोजगाराचे प्रकल्प उभारण्यासाठी सवलतयुक्त वित्त पुरवठा करणे, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाव्दारे सफाई कर्मचाऱ्याच्या मुलांना व्यावसायीक व तांत्रीक शिक्षणासाठी अनुदान किंवा कर्जाच्या स्वरूपात वित्त पुरवठा करणे, सफाई कामगारांना धोकादायक व गलिच्छ कामातून मुक्त करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सुरू केलेल्या सफाई कामगारांची मुक्तता व पुनर्वसन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांस विद्यावेतनासह कौशल्य प्रशिक्षण देवून स्वयंरोजगारासाठी 4–6 टक्के व्याजदराने भांडवली अनूदान देणे, अनुसूचित जातींमधील तरूणामध्ये उद्योजक निर्माण करण्यासाठी पत हमी निधी व जोखीम भांडवली निधी या निधीची स्थापना करणे यासारख्या आर्थिक सबलीकरणाच्या योजना राबविल्या जातात.

## समाजिक सबलीकरण :–

समाजिक सबलीकरणामध्ये नागरी हक्क संरक्षण अधिनियम आणि अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम (अॅट्रॉसिटी) ची अंमलबजावणी करणे, पंतप्रधान आदर्श ग्रामयोजनेव्दारे 50 टक्के पेक्षा अधिक अनुसूचित जातींची लोकसंख्या असलेल्या गांवामध्ये केंद्रीय योजना, राज्य योजना तसेच विविध वित्तीय योजनांमध्ये समन्वय घडवून गावाचा विकास करणे, अनुसूचित जातीच्या रोजगारात व उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी सुरू केलेल्या प्रकल्पना (मोबाईल डिस्पेसरी, निवासी / गैरे–निवासी शाळा, हॉस्पीटल, कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर इत्यादी.) खंर्चाच्या 90 टक्के पर्यंत वित्तीय सहाय्य देणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बाबु जगजीवनराम प्रतिष्ठानची स्थापना करून देशातील तसेच परदेशातील जनतेपर्यंत त्याची विचारप्रणाली आणि सामाजिक न्यायाबाबतचा संदेश पोहचविण्यासाठी कार्यक्रम व कृतीयोजनांची अंमलबजावणी करणे यासारख्या योजना व कार्यक्रमाचा यात समावेश करण्यात आला.

## संदर्भ :–

1) सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालय, विशेष घटक योजना, वार्षिक अहवाल.
2) सामाजिक न्यायाच्या योजना महाराष्ट्र राज्य.